# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २२ ऑगस्ट २०१७.

**११४ ग्रामपंचायतींसाठी**
**२३ सप्टेंबरला मतदान**

मुंबई, दि. २२: विविध जिल्ह्यांतील ऑक्टोबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने अस्तित्वात आलेल्या ११४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २३ सप्टेंबर २०१७ रोजी मतदान होणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी काल येथे केली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात अचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकांसाठी ४ ते ८ सप्टेंबर २०१७ या कालावधीत सुट्टीचा दिवस वगळून नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील. १३ सप्टेंबर २०१७ पर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल. २३ सप्टेंबर २०१७ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. गडचिरोली जिल्ह्यात मात्र दुपारी ३.०० वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. सर्व ठिकाणी २५ सप्टेंबर २०१७ रोजी मतमोजणी होईल.

**निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या अशी: पालघर-** ८, **नाशिक-** २२, **नंदुरबार-** १, **अहमदनगर-** ८, **पुणे-** १, **औरंगाबाद-** ४, **नांदेड-** ४, **उस्मानाबाद-** १, **जालना-** ४०, **हिंगोली-** १३, **यवतमाळ-** ७, **चंद्रपूर-** ४ आणि **गडचिरोली-** १. **एकूण-** ११४.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)